# राज्य माहिती आयोग, मुख्यालय, मुंबई

माहितीचा अधिकार

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ (१) अन्वये दाखल केलेली तक्रार**

**क्र.मुमाआ/नों.क्र.६०४०/२०/त.क्र.१०१/२५/०१**
**क्र.मुमाआ/नों.क्र.६०४१/२०/त.क्र.१०२/२५/०१**
**क्र.मुमाआ/नों.क्र.६०४२/२०/त.क्र.१०३/२५/०१**
**क्र.मुमाआ/नों.क्र.६०४३/२०/त.क्र.१०४/२५/०१**
**क्र.मुमाआ/नों.क्र.६०४४/२०/त.क्र.१०५/२५/०१**
**क्र.मुमाआ/नों.क्र.६०४५/२०/त.क्र.१०६/२५/०१**
**क्र.मुमाआ/नों.क्र.६०४६/२०/त.क्र.१०७/२५/०१**
**क्र.मुमाआ/नों.क्र.६०४७/२०/त.क्र.१०८/२५/०१**
**क्र.मुमाआ/नों.क्र.६०४८/२०/त.क्र.१०९/२५/०१**

**श्री. वैभव मोहन ठाकूर**
रूम नं. ६, जीवनधर्मा सोसायटी फायर ब्रिगेडच्या समोर,
कोपरी ठाणे (पू.)-४००६०३

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (इ व का) पी/उत्तर विभाग**
बृहन्मुंबई महानगरपालिका, सहाय्यक आयुक्त
पी/उत्तर विभाग कार्यालय इमारत, लिबर्टी गार्डन समोर,
मामलेदारवाडी, मालाड (प), मुंबई ४०० ०६४.

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा विभाग कार्यकारी अभियंता पी/उत्तर विभाग**
बृहन्मुंबई महानगरपालिका, सहाय्यक आयुक्त
पी/उत्तर विभाग कार्यालय इमारत, लिबर्टी गार्डन समोर,
मामलेदारवाडी, मालाड (प), मुंबई ४०० ०६४.

**तक्रार अर्ज सुनावणी दिनांक : ११.११.२०२५**

| | | |
|---|---|---|
| तक्रारदार | : | उपस्थित |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | अनुपस्थित |
| प्रथम अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |

सदर तक्रार अर्जावर आज दि.११.११.२०२५ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली असून सुनावणी दरम्यान तक्रारदार उपस्थित आहेत. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (इमारत व कारखाने) पी/उत्तर विभाग व विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता पी/उत्तर विभाग अनुपस्थित आहेत.

तक्रारदार यांनी असे विशद केले की, द्वितीय अपील आदेशानंतरही मूळ अर्जात मागणी केलेली माहिती प्राप्त झाली नाही. सदर माहिती प्राप्त करून द्यावी, ही विनंती.

या तक्रार संदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर आयोग या निष्कर्षावर येत आहे की, आज झालेल्या सुनावणीत तक्रारदार श्री. वैभव ठाकूर यांनी त्यांच्या विविध द्वितीय अपील अर्जावर तत्कालीन मा.मुख्य माहिती आयुक्त यांनी दि.०१.१०.२०२२ रोजी पारित केलेल्या आदेशाचे अनुपालन झाले नसून विशेषत: तक्रारदार यांनी केलेल्या विविध तक्रारीवर स्थळ निरीक्षण करणे आवश्यक असल्याने संबंधित जागेच्या स्थळ निरीक्षण ३० दिवसात करून अपिलकर्ता यांना स्थळ निरीक्षण अहवाल व पुढील कार्यवाहीची माहिती स्पीड पोस्टाने नि:शुल्क देण्यात यावी, असे आदेशीत केले असून त्याचे अनुपालन झाले नसल्याने संबंधित जन माहिती अधिकारी यांच्या विरूद्ध शास्ती शिस्तभंगाची कारवाई माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ यातील कलम १८(१) नुसार सखोल चौकशी तसेच गुन्हा देखील दाखल करण्याचे आदेश मागितले आहे.

आज प्राधिकरणातर्फे म्हणजेच विद्यमान जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (इमारत व कारखाने) पी/उत्तर विभाग व विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता पी/उत्तर विभाग यांच्यापैकी कुणीही उपस्थित नाहीत. आयोगाच्यावतीने याआधीच सर्व संबंधितांना उपस्थित राहण्याविषयी सुचित करण्यात आले असून आजच्या सुनावणीची वादसुची देखील आयोगाच्या संकेत स्थळावर उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.

तथापि, नैसर्गिक न्यायतत्त्वानुसार संबंधित प्राधिकरणा विरुद्ध किंवा तक्रारदारांनी दाखल केलेल्या तक्रार अर्जावर कुठलाही निर्णय देण्यात येईल. त्याआधी दोन्ही बाजु एकूण घेणे आवश्यक असून माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ यातील कलम २०(१) व २०(२) अन्वये नैसर्गिक न्यायतत्त्वाला अनुसरून तक्रारदार श्री. वैभव ठाकूर यांच्या तक्रार अर्जावर तसेच दि.०१.१०.२०२० रोजी पारीत आदेशावर केलेल्या कार्यवाही संदर्भात खुलासा सादर करण्याची एक अंतिम संधी जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (इमारत व कारखाने) पी/उत्तर विभाग आणि प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता पी/उत्तर विभाग यांना प्रदान करण्यात येत असून आदेश प्राप्त होताच पुढील २ आठवड्यांच्या आत संबंधित प्राधिकरणाचा खुलासा प्राप्त न झाल्यास प्रस्तुत तक्रार अर्जावर नियमानुसार एकतर्फी कारवाई करण्यात येईल. तसेच संबंधित अधिकाऱ्यांनी त्यांच्या खुलाशासोबत पारित केलेल्या द्वितीय अपील आदेशाचे अनुपालन झाले नसल्याचा अनुपालन अहवाल देखील सादर करावा. तसेच त्यात निर्देशीत केल्याप्रमाणे संबंधित स्थळाची पाहणी केली असल्यास त्याही अहवालाच्या साक्षांकित प्रती उपलब्ध करून द्याव्यात.

**आदेश**

**१. वरील विवेचनानुसार जन माहिती अधिकारी यांनी कार्यवाही करावी.**
**२. वरील सर्व तक्रार अर्ज निकाली काढण्यात येत आहेत.**

**ठिकाण : मुंबई**
**दिनांक : ११.११.२०२५**

**( राहुल भा. पांडे )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

State Information Commission
Maharashtra